जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३८७ दिनांक - २५/०५/२०२३**

अंमली पदार्थ विरोधी पथक -१ गुन्हे शाखा पुणे शहर

**डनजो ऑनलाईन डिलीव्हरी ॲपचा वापर करून एल.एस.डी. अंमली पदार्थ उच्च-शिक्षीत तरूणांकडून विक्री व एकुण ५१,६०,०००/- रुपयांचा साठा केला जप्त**

दिनांक २३/०५/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक १ कडील अधिकारी व स्टाफ पुणे शहरात पेट्रोलिंग करीत असताना,पोलीस अंमलदार विशाल शिंदे यांना कोथरुड व इतर भागात **डनजो ऑनलाईन डिलीव्हरी ॲपव्दारे** एल.एस.डी. या अंमली पदार्थाची खरेदी विक्री होत आहे. त्याअनुषंगाने सखोल माहिती घेतली असता, इसम नामे १) **रोहन दिपक गवई,वय २४ वर्षे,रा.सध्या स्वापनंदा हाऊसिंग सोसा,फ्लॅट नं.३३ डिपी रोड कर्वे पुतळा पुणे** यांस पेट्रालिंग दरम्यान ताब्यात घेतले असता त्याचेकडुन किं.रु.१,५०,०००/- चा त्यामध्ये **कि.रु. ९०,०००/- रु चे ३० मिलीग्रॅम एल एस डी** व इतर ऐवज हस्तगत करण्यात आलेला असुन त्यामध्ये त्याचे इतर साथीदारांचा देखील समावेश असल्याचे निष्पन्न झालेने सदर बाबत **कोथरुड पो.स्टे.पुणे गुरनं.११९/२०२३,एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क),२२(क),२९** अन्वये दि.२४/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचा सखोल तपास करता **डनजो या डिलीव्हरी ॲपव्दारे** एल.एस.डी. या अंमली पदार्थाची खरेदी विक्री होत असल्याचे निष्पन्न झालेने वरील नमुद आरोपीचे संगनमत व साखळी पध्दतीने असलेले साथीदार नामे **२)सुशांत काशिनाथ गायकवाड,वय २६ वर्षे रा.फ्लॅट नंबर एस १ ठक्कर रेसीडन्सी संभाजीनगर कोडोली सातारा सध्या रा.बी ८०१ पेरिविन्कंल सोसायटी ननावरे चौक,बाणेर पुणे ३)धिरज दिपक लालवाणी वय २४ वर्षे,रा,फ्लॅट नं.ए-१४, जी-३ प्लॅनेट मिलीनियम,पिंपळे सौदागर,पुणे ४)दिपक लक्ष्मण गेहलोत वय २५ वर्षे,रा,डि-२ फ्लॅट नं.५०१, शिवसागर सिटी, फेज नं-१ सनसिटी रोड, आनंदनगर पुणे ५)ओंकार रमेश पाटील, वय-२५ वर्षे रा.स.नं.१०८/३/१/बी,पाटील साई व्हिला,अक्षरा इंटरनॅशनल स्कुल समोर,वाकड, पुणे** यांचा बाणेर,सिंहगड रोड,पिंपळे सौदागर,वाकड परिसरातुन शोध घेऊन अटक करण्यात आलेली असुन आरोपी क्रं.१,३,५ यांचे ताब्यातुन अनुक्रमे खालील वर्णनाचा ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे.

१) रु.१,५०,०००/- आरोपी नामे रोहन दिपक गवई याचे ताब्यात मिळालेले **कि.रु. ९०,०००/- रु चे ३० मिलीग्रॅम एलएसडी या अंमली पदार्थाचे ०२ स्ट्रिप्स** व इतर ऐवज

२) रु.३०,४०,०००/- इसम नामे धिरज दिपक लालवाणी याचे ताब्यातील बॅगेमध्ये त्यामध्ये **किं.रु.२९,४०,०००/- चे ०९ ग्रॅम ८८० मिलीग्रॅम वजनाचे एलएसडी या अंमली पदार्थाचे ५८८ तुकडे संलग्न असलेली एक कागदी शिट** व इतर ऐवज

३) रु.२१,४५,०००/- इसम नामे ओंकार रमेश पाटील याचे ताब्यात मिळुन आलेला **किं.रु.२१,३०,०००/- चे ०७ ग्रॅम ०९० मिलीग्रॅम वजनाचे एलएसडी या अंमली पदार्थाचे ४२६ तुकडे** व इतर ऐवज

असा एकुण किं.रु.५३,३५,०००/- त्यामध्ये **किं.रु. ५१,६०,०००/- चे एलएसडी अंमली पदार्थाचे १७ ग्रॅम वजनाचे १०३२ तुकडे व इतर ऐवज हस्तगत करण्यात आलेला आहे.**यातील आरोपी क्रं.१ ते ४ यांची मा.न्यायालयाने दि.२६/०५/२०२३ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली आहे व आरोपी क्रं.५ यास आज दि.२५/०५/२०२३ रोजी मा.न्यायालयात रिमांडकामी हजर ठेवणार असुन,दाखल गुन्हयाचा तपास अधिकारी सपोनि शैलजा जानकर व स्टाफ हे सखोल तपास करीत आहेत

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त श्री.संदिप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. अमोल झेंडे, मा.सहा.पो.आयुक्त,गुन्हे-१,श्री सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१,गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड,सहा.पोलीस निरीक्षक,शैलजा जानकर,पोलीस अंमलदार,विशाल शिंदे,मनोजकुमार साळुंके,मारुती पारधी,पांडुरंग पवार,सुजित वाडेकर,ज्ञानेश्वर घोरपडे,प्रविण उत्तेकर,विशाल दळवी,संदिप शिर्के,राहुल जोशी,संदेश काकडे,नितेश जाधव,सचिन माळवे,रेहाना शेख योगेश मोहिते यांनी केली आहे.